**पुढील आदेश निशाणी क्र. ४०**
(दिनांक ०८ जून, २०२६ रोजी पारीत)

दिनांक २८/०४/२०२६ रोजीच्या आदेशानुसार, वादी आणि प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ४२ वरील पुरसीसद्वारे वकील श्री. पी. एच. शेख यांची स्थळ पाहणी करून अहवाल सादर करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यास संमती दर्शविली आहे. त्यायोगे खालीलप्रमाणे आदेश पारीत येत आहे:

**आदेश**

१.वकील श्री. पी. एच. शेख यांची सदर प्रकरणामध्ये न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे;

२. श्री. शेख यांनी दावा, त्यासोबतची कागदपत्रे, सदरचा अर्ज आणि त्याखालील दिनांक २८/०४/२०२६ रोजीचा आदेश यांचे अवलोकन करुन जायमोक्यावर जावून स्थळ पाहणी करावी आणि तेथे आदेशामध्ये नमूद केल्यानुसार खालील बाबीं कराव्यात:

अ. वादीं यांच्या क्षेत्रामध्ये बांध आहे किंवा नाही, त्याची लांबी आणि रुंदी किती;

ब. वादींच्या शेतजमिनीच्या बांधावरुन रस्ता आहे किंवा नाही;

क. वादीं आणि प्रतिवादीं यांनी दिलेला दावा आणि लेखी कैफियतीसोबत जोडलेल्या नजरी नकाशाप्रमाणे स्थिती आहे किंवा नाही;

ड. दाव्यासोबतच्या परिशिष्टामध्ये दिलेल्या नजरी नकाशात दर्शविल्याप्रमाणे पश्चिम, उत्तर आणि पुर्व बाजूने कालवे आणि सिमेंट रस्ते आहेत का;

इ. प्रतिवादींना वादींच्या बांधाशिवाय ईतर

कोठून रस्ता आहे किंवा नाही;

३. न्यायालयीन आयुक्त यांचे मानधन किती राहील याची गणणा स्थळ पाहणी केल्यावरुन आणि अहवाल प्राप्त झाल्यावरुन केली जाईल; परंतु तत्पूर्वी त्यांना प्रतिवादी क्र. ३ ते ८ यांनी रुपये ५,०००/— एवढी रक्कम तात्पुरते मानधन द्यावी;

४. न्यायालयीन आयुक्त यांना याचिका निर्गमीत करा;

५. न्यायालयीन आयुक्त यांनी एक महिन्याच्या आत स्थळ पाहणी करुन अहवाल सादर करावा.

Digitally signed by BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Date: 2026.06.08 18:13:09 +0530

दिनांक: ०८.०६.२०२६

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P D F file order/ judgment are same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | N. V. Koli<br>Stenographer Grade-II |
| Name of Court | : | Civil Judge Senior Division<br>Bhoom, Tq. Bhoom<br>Dist. Osmanabad. |
| Order/ Judgment date | : | 08.06.2026 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | : | 08.06.2026 |
| Order/ Judgment uploaded on | : | 08.06.2026 |